महाराष्ट्र शासन

**बैठकीचे इतिवृत्त**

**दि.०६.०८.२०१४ रोजी दुपारी ३.३० वा.**

**क्र.एबाविं-२०१२/प्र.क्र.४०९/का.६**
महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दूरध्वनी ०२२-२२७९३९२४
फॅक्स ०२२-२२८२८२८१
Email - icdsd6@gmail.com
**दिनांक :- ११ ऑगस्ट, २०१४**

प्रति,

१) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
३) विभागीय उपआयुक्त, **मुंबई विभाग,** महिला व बाल विकास विभाग, रियर विंग, रायगड भवन, १ ला मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४
४) उपआयुक्त (अंगणवाडी), महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) श्री. अवधूत राणे, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीज, मुंबई
६) श्रीमती वृषाली पिसपाटी, चिफ एक्सिकेटिव्ह ऑफीसर, मुंबई मोबाईल क्रेशज, मुंबई

**विषय :- मुंबई शहरात सुरु असलेल्या बांधकाम साईटवर पाळणाघर/अंगणवाडी सुरु करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास, नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला, मंत्रालय समोर, मुंबई - ३२ यांचे दालनात **दिनांक ०६ ऑगस्ट, २०१४ रोजी दुपारी ३.३० वाजता** आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

(दि. म. पाटील)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. प्रधान सचिव (म. व बा. वि.) यांचे वरीष्ठ स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२) उप सचिव (म. व बा. वि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

E:\NEW MY DOCUMENT\Letters 2014.doc

**मुंबई शहरात सुरु असलेल्या बांधकाम साईटवर पाळणाघर / अंगणवाडी सुरु करणेबाबत मा. प्रधान सचिव (म. व बा. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी दुपारी ३.३० वाजता झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

**सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी व संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

| अ. क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. ब. बा. चव्हाण | उप सचिव, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई |
| २ | श्री. दि. बा. पाटील | कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई |
| ३ | श्री. अवधूत राणे | महाव्यवस्थापक, एम.सी.एच.आय. मुंबई |
| ४ | श्रीमती वृषाली पिसपाटी | सी.ई.ओ. मुंबई मोबाईल क्रेशेस, मुंबई |
| ५ | श्रीमती वृषाली नाईक | Prog. Co-ord., मुंबई मोबाईल क्रेशस, मुंबई |
| ६ | श्री. प्रदीप शिंदे | Prog. Co-ord., मुंबई मोबाईल क्रेशस, मुंबई |
| ७ | श्री. राजेंद्र सोनवणे | सहाय्यक विस्तार अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका |
| ८ | श्री. प्रताप पाटील | बाल विकास प्रकल्प अधिकारी, कुर्ला, मुंबई |
| ९ | श्री. के. जे. वळवी | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विभागीय उपायुक्त कोकण विभाग, यांचे कार्यालय, नवी मुंबई |
| १० | श्रीमती सुजाता पाटील | मुख्यसेविका, भांडूप (पूर्व), मुंबई |

सदर बैठकीत सांगोपांग चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) मुंबई मोबाईल क्रेशज यांच्याकडून बेलासास रोड, मुंबई सेंट्रल येथे सुरु असलेल्या पाळणाघरातील केंद्राव THR व गरम ताजा आहाराचा पुरवठा होत नसल्यामुळे त्यांना तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच इतर ठिकाणी पाळणाघरात नियमीत आहाराचा पुरवठा करण्याबाबत विभागीय उपआयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांनी कार्यवाही करावी.

२) मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर विकासकाला नवीन बांधकामे परवाने देताना बांधकामावरील मजूरांच्या मुलांकरीता डे केअर सेंटर (पाळणा घर) सुरु करण्यासाठी पुरेशी जागा देणे बंधनकारक करुन परवान्यामध्ये तशी अट ठेवण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु असल्याचे महानगरपालिकेच्या प्रतिनिधीकडून सर्वांच्या निदर्शनास आणण्यात आले.

३) मुंबई महानगरपालिकेमार्फत साईनगर कांदीवली येथे बांधकाम चालू आहे. त्या ठिकाणी बांधकाम करणा-या मजूरांची ५४ मुले आहेत. त्या मुलांसाठी पाळणाघर मुंबई मोबाईल क्रेशज यांचेकडून सुरु करण्यासाठी जागा देणेबाबत मुंबई महानगरपालिकेने कार्यवाही करावी.

४) ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी कर्मचा-यांना देण्यात येणा-या प्रशिक्षणामध्ये मुंबई मोबाईल क्रेशज यांचेकडूनही प्रशिक्षण देण्यास मान्यता द्यावी अशी विनंती मुंबई मोबाईल क्रेशजचे CEO यांनी केल्यामुळे तशी मान्यता देण्यात आली.

५) मुंबईमध्ये जेथे नवीन बांधकामे सुरु आहेत त्या ठिकाणी पाळणाघर सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत MCHI, मुंबई मोबाईल क्रेशज व शासन यांचा एकत्रितरित्या MOU करण्यासाठी MOU चा मसुदा MCHI CREDAI यांनी उपलब्ध करुन द्यावा.

६) अंगणवाडी सेविका प्रशिक्षण केंद्रात पाळणाघर सेविकेस प्रशिक्षण देता येईल काय हे आयुक्त कार्यालयाकडून तपासून पुढील कार्यवाही करावी.

शेवटी मा.प्रधान सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

* * * * *

13,035
22/8/14